कला अकादमी गोवा
पणजी–गोवा

कअ/काविवि/भ. का/२०२६–२७/५६७
दि.१०/० ६/२०२६

## कृपया प्रसिध्दीसाठी

कला अकादमीची भजन कार्यशाळा श्री पांडुरंग राऊळ यांच्या मार्गदर्शनाखाली कला अकादमीच्या कृष्णकक्षात दि. १२ जून २०२६ पर्यंत चालू राहिल. गोमंतकीय भजन शैली आणि बाज यातील बारकाव्यांचा अभ्यास या कार्यशाळेच्या निमित्ताने होत आहे. विविध संतांच्या रचना विविध रागात पारंपारीक पध्दतीने सादर करण्यात निपूण असलेले श्री. राऊळ कार्यशाळेतही सहभागी कलाकारांना त्याच धर्तीवर मार्गदर्शन करीत आहेत. नामपर बिहाग रागात, सेवा ते आवडी उच्चारावे नाम।भेदाभेद काम निवारुनी तर तिलक कामोद रागामध्ये, धरी रे मना तू विश्वास या नामी।अखंड रामनामी ओळख धरी. ही रचना त्यानी कलाकारांकडून आळवून घेतली. तसेच रसरंजनी या रागात, नामतेची रुप।रुप तेची नाम। नामा रुपा भिन्न नाही नाही. ही रचना शिकवली. छंद मजला विठ्ठलाचा।ज्ञानदेव ज्ञानीयांचा. हा नागस्वराली रागामधील अभंग तर परमेश्वरी या रागात कान्हा तुला रे, कृष्णा तुला रे, ताकीद करते कुणाच्या घरला।घडी घडी जावू नको रे. ही गवळण कलाकारांकडून गाऊन घेतली. अशा रचना त्यांनी सादर करुन त्यामधील गोडवा शिबीरार्थीना विस्कटावून सांगीतला.

सदर कार्यशाळेसाठी त्यांना संवादीनी साथ महेद्र महाले तर पखवाज साथ निशीकांत कळंगुटकर यांची लाभली आहे.

(श्री. प्रदीप गांवकर)
कार्यक्रम व विकास अधिकारी

प्रति,
१.गोमंतक २.नवप्रभा ३.तरुण भारत ४.पुढारी ५.लोकमत ६.दै.हेराल्ड
७.गोवन वार्ता, ८. दै भांगरभूंय ९.आकाशवाणी पणजी केंद्र( वृत्तविभाग)